**<u>नि.दि.दावा क्र. ८१७/२०१४</u>**

निशाणी क्र.५७ लगत.

<u>प्रतिवादींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ढोकळे यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>

वादीचे मुळ पुरुष सावळेराम हे होते. सावळेराम हे मयत आहेत व त्यांना दोन मुले नामे धिरु व गणपत अशी आहेत. धिरु व गणपत हे देखील मयत आहेत. धिरु यास शिवराम नावाचा मुलगा आहे. गणपत यास गोपाळा हा मुलगा आहे. गोपाळा यास पत्नी होती व तिने त्यास सोडुन दिले आहे. गोपाळा यास मुलबाळ नव्हते. शिवराम यास राजाराम व अविनाश हे दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सावळेराम यांच्या वारसांमध्ये सन १९३५ पुर्वी वडिलोपार्जित मिळकतींचे वाटप झाले होते. शिवराम व गोपाळा यांच्यामध्ये झालेल्या मिळकतीच्या वाटपाची तारीख मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्यामध्ये वाटणी होवुन स्वतंत्र वहिवाट होती. गोपाळा यास क्षयरोग झाला होता. त्यास त्या आजारासाठी पैशाची गरज होती का हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गोपाळा याच्या हिश्याला आलेली जमीन त्याने प्रतिवादी क्र.१ व २ ते १० यांचे पुर्वहक्कदार यांना सन १९५७ साली विक्री केली होती. मला सन १९५७ सालच्या खरेदीखताबाबत वैयक्तिक माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोपाळा शिर्के यांच्या नावाने आलेली जमीन त्यांनी त्यांच्या आजारपणासाठी सन १९५७ साली विकली. सन १९५७ चे खरेदीखत हे कायदेशिर आहे किंवा कसे याबाबत दावा दाखल करेपावेतो कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोपाळा गणपत व धिरु सावळेराम यांना सदर दावा मिळकत सोडुन इतर मिळकती होत्या. हे म्हणणे खरे आहे की, इतर मिळकती ज्या होत्या त्या सदर दाव्यामध्ये सामील केल्या नाहीत. सदर दावा दाखल करताना सदर दावा मिळकत सोडुन इतर मिळकती असल्याबाबत मला माहिती होती.

प्रश्न– दि.१८.१२.१९५७ रोजीचे खरेदीखतानुसार ७/१२ वर नोंद घेण्याचे राहिले होते.

उत्तर– खरेदीखत झालेच नाही म्हणुन नाव नोंदविले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, सन १९५७ पासुन प्रतिवादीकडे सदर मिळकतीचा ताबा होता. सदर वाद मिळकतीमध्ये प्रतिवादीच्या आता वस्त्या आहेत अगोदर नव्हत्या.

**<u>प्रतिवादींचे विधिज्ञांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>**.

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/–**

दिनांक : २३/०६/२०२५ ( एम. सी. शेख )

पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर

प्रतिवादींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ढोकळे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरु–

हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३४४ मध्ये दशरथ शिर्के व सोना शिर्के यांनी घराचे बांधकाम केले आहे. न्यायालयात दावा टाकल्यापासुन तेथे लोकांनी घरे बांधले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यापुर्वी अनेक वर्षापासुन तेथे लोकांची घरे बांधलेली आहेत. ग्रामपंचायत कर्जुले हर्या या ग्रामपंचायतमध्ये त्या घरांच्या नोंदी आहेत का हे मला माहित नाही. सदर ग्रामपंचायतीत कर भरण्याबाबत लोकांनी पावत्या दाखल केल्या आहेत का हे मला माहित नाही. सदर लोकांनी महावितरण कंपनीमध्ये विद्युत कनेक्शनसाठी अर्ज करुन विद्युत कनेक्शन घेतले आहे का हे मला माहित नाही. तसेच सदर लोकांनी पतसंस्था व बॅंकांकडुन कर्ज घेतले आहे का हे मला माहित नाही. सन १९५७ पासुन सदर जागेवर माझा ताबा असलेबाबत माझ्याकडे ७/१२ उतारा आहे व तो दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–यामध्ये इतर हक्कामध्ये सदर प्रतिवादींची नावे आहेत. त्यांची नावे कधीपासुन आहेत हे मला माहित नाही. अंदाजे २५–३० वर्षापासुन मला सदर लोकांची नावे इतर हक्कामध्ये नोंद झाल्याची माहिती आहे. सदर अर्जदारांमध्ये इतर हक्क असलेबाबत व ते चुकुन लागल्याबाबत तसा अर्ज मी कोठे केला नाही. फेर क्र.२०९९ कधी मंजुर झाला हे मला सांगता येत नाही. गट क्र.३४४ च्या चतुःसिमा मी सांगु शकतो. दावा दाखल करताना सदर गट क्रमांकाच्या चतुःसिमा माहित होत्या. माझ्या भावाचे आणि माझे वाटप तोंडी स्वरुपात झाले होते. माझ्या वाटयाला पश्चिम दिशेचे क्षेत्र आले होते. सदर माझ्या वाटयाच्या पश्चिम दिशेचे क्षेत्र मी सांगु शकतो. सदर जमीनीच्या चतुःसिमा दाव्यात नमुद न करण्याचे कारण मी सांगु शकत नाही. आम्ही चारही भावंडांनी माझ्या पत्नीला खरेदीखत करुन दिले. आम्ही भावंडांनी माझ्या पत्नीच्या नावे करुन दिलेल्या खरेदीखतामध्ये सदर जमीनीच्या चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. माझ्या पत्नीचा पश्चिम दिशेला ताबा असलेबाबत ७/१२ सोडुन इतर कोणताही कागद दाखल केलेला नाही. माझी पत्नी हयात नाही. तिला चार वारस आहेत. मी माझ्या मुलांचे मुखत्यारपत्र घेतले आहे. सदर वाद मिळकतीमध्ये रस्ता मंजुर झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा सदर वाद मिळकतीमध्ये सन १९५७ पासुन प्रत्यक्ष कब्जा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सध्या प्रतिवादी सदर मिळकतीमध्ये घरे बांधुन राहतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी सदर मिळकत सन १९५७ मध्ये खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाद मिळकतीला सोडुन इतर मिळकती मी दाव्यामध्ये सामील केल्या आहेत. प्रतिवादीची सध्या तेथे पक्की घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सोना शिर्के यांच्या वारसांना दावा दाखल केल्यानंतर सदर जमीन खरेदीखत करुन दिली आहे. मी सोना शिर्के यांच्या वारसांना पश्चिम दिशेची जमीन खरेदी करुन दिली. मी त्यांना माझ्या हिश्याच्या क्षेत्रातील निम्मी जमीन दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी

ज्या मिळकतीचा न्यायालयात हक्क मागत आहे तेवढया मिळकतीवर माझी हक्क नाही व मला हक्क मागता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

sd/-

(एम. सी. शेख)

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

पारनेर

दिनांक– २१.०७.२०२५

पारनेर